संगीता जोशी

# ये चमनजार

# ये चमनजार

## संगीता जोशी

ई साहित्य प्रतिष्ठान

ये चमनजार (काव्यरसास्वाद)

संगीता जोशी
A-1, भूषण अपार्टमेंट,
11/2, कर्वेनगर, कमिन्स कॉलेजजवळ, पुणे 411052
Phone : 9665095653
sanjoshi729@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : १७ सप्टेंबर २०१७

©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

**ये चमनजार**

हाय! हॅलो!! नमस्कार !! साईराम !!!

साहिर लुधियानवी

निरागस प्रेम......

कवितांची कविता—गझल

गुलोंमें रंग भरे.....

प्रेम

प्रेम की..... प्रे.....?

एक मैफल...

और कुछ देर ठहर

कुठे आहेस तू....???

कथा-एका कवितेची... गीतांजलीमधून

एकदा काय झालं,

सुभाषिते...

मीनाकुमारी---

# संगीता जोशी



सांप्रत मराठी कविता आणि विशेषतः मराठी गझलच्या रसिकांना संगीता जोशी यांची नव्याने ओळख करून द्यायची गरज नाही. मराठीतील त्या पहिल्या मराठी गझलकार. २००४ सालच्या अमरावती येथील मराठी गझल संमेलनाच्या त्या अध्यक्षा होत्या. त्यांची आजवर प्रसिद्ध झालेली म्युझिका, वेदना संवेदना, चांदणे उन्हातले, मराठी गझल, नजराणा शायरीचा भाग १ व २, ती भेटते नव्याने अशी अनेक पुस्तके रसिकांच्या मनात स्थान करून आहेत. अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आले आहे. अनेक सभा, मैफ़ली व संमेलनांतून त्यांनी आपले काव्य सादर केले आहे. टिव्ही मालिका, ध्वनीमुद्रिका यांतून त्यांची गीते प्रसिद्ध झाली आहेत. गेली पन्नास वर्षांहून अधिक काळ त्या लिहीत आहेत.

या सर्व सन्मानांमध्ये गुंतून न रहाता त्यांचा लेखनप्रवास सुरूच आहे. आणि त्यासाठी त्या नवनवीन माध्यमांचा मागोवा घेत असतात. त्यांच्या ब्लॉगवरील काही निवडक लेखांचा हा संग्रह.

## हाय! हॅलो!! नमस्कार !! साईराम !!!

ही आपली पहिलीच भेट. पहिलीच ओळख. निदान ह्या माध्यमातून. पण पहिलेपणाच्या सर्व गोष्टी तपशीलासह निश्चितच आपल्या लक्षात राहतात, नाही का? तुमचा काय अनुभव? हाच असणार. मला माहीतय्. उदाहरणार्थ पहिलं प्रेम ! (म्हणजेच दुसरं, तिसरं... आयुष्यात येतच असतं!!)तर, हे पहिलं वहिलं प्रेम. त्याबद्दलच मी आपल्या ह्या पहिल्या भेटीत बोलणार आहे. माझ्या पहिल्या प्रेमाविषयी..... कान टवकारले ना?

...... माझं पहिलं प्रेम म्हणजे गझल !! उर्दू असो, मराठी असो.. मी तिच्या प्रेमातच आहे... आणि मग ज्या चांगल्या गझला प्रिय होतात त्यांचे कवीही हृदयाजवळ राहतात. माझी ज्या उर्दू कवीशी प्रथम ओळख झाली तो होता साहिर लुधियानवी. त्यानं हिंदी सिनेमातली खूप गीतंही लिहिली. त्याची एक गझल... तुम्हाला माहीतही असेल ती.

***मैं ज़िन्दगीका साथ निभाता चला गया***

***हर फिक्र को धुएमें उडाता चला गया... 1***

देव आनंदची आठवण झाली ना? त्याच्या सदाहरित व्यक्तिमत्वाइतकेच हे टवटवीत व अर्थपूर्ण शब्द... सोपं लिहिणं खूप अवघड असतं म्हणतात. इतकं सोपं की ते सहज हृदयाला भिडतं. जे शब्द हृदयाला भिडतात त्याचे प्रतिध्वनी मनात उमटत राहतात. माझ्याही मनात ते उमटलेत... मराठीत..

*मी जीवनास मूक स्विकारीत राहिलो*

*चिंतेस फुंकरीवरी झटकीत राहिलो... 1*

हे मराठी शेरही मी त्याच चालीत गुणगुणत राहिले. पुढचे तीन उर्दू शेर व त्यानंतरचे मराठी शेर वाचून बघा.

*बर्बादियोंका सोग मनाना फिज़ूल था*

*बर्बादियोंका जश्न मनाता चला गया... 2*

*उद्ध्वस्त जाहलो न कधी खेद मानिला*

*उद्ध्वस्त हाच उत्सव मानीत राहिलो.. 2*

*गम और खुशी में फर्क न महसूस हो जहां*

*मैं दिल को उस मकामपे लाता चला गया... 3*

*सुखदुःख एकरूपच होते जिथे कुठे*

*मन मी तिथेच नेउन रमवीत राहिलो... 3*

*जो मिल गया उसीको मुकद्दर समझ लिया*

*जो खो गया मैं उसको भुलाता चला गया... 4*

*दैवास मान्य तेच ओंजळीत राहिले*

*जे लाभले न, सर्वच विसरीत राहिलो... 4*

तिसऱ्या शेरात तर साहिरने भ. गीतेतलं तत्वज्ञानच सांगितले आहे.

*सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ*

*ततो युध्दाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि*

---सुख-दुःख. लाभ-हानी, जय-पराजय याचा विचार न करताच जीवनाची लढाई लढली पाहिजे! कवी हा तत्वज्ञानीच असतो असे म्हणतात ते उगीच नाही, पटलं? सिनेमाच्या गीतांखेरीज साहिरची इतर शायरीही वेड लावणारी आहे. ज्या एका कवितेनं त्याच्या डोक्यावर मुकुट(ताज) ठेवला, ती कविता पुढल्या भागात.....

(क्षमस्व!!उर्दूचे लेखन उच्चारानुसार आहे व नुक्ते देणे अडचणीचे आहे, हे कृपया समजावून घ्यावे)

# साहिर लुधियानवी

उर्दू शायर साहिर लुधियानवी हा शायरीच्या आभाळातला चमचमता तारा होता, पण त्याच्या वाट्याला आलेलं जीवनाचं आभाळ मात्र अंधःकारमय होतं. वडिलांनी आईला तलाक दिला, तो मात्र आईजवळच राहिला. गरिबीतही शिक्षण घेतलं. पण तेही अर्धवट सोडावं लागलं.

आयुष्यात प्रेम तर भेटलं पण लाभलं कधीच नाही. चुकून प्रेयसीकडून होकारार्थी उत्तर मिळालंच आणि तिनं भेटायला यायचं कबूल केलंच तर साहिरची एक छोटीशी अट आहे. तिची इच्छा आहे की 'प्रेमाचं चिरंतन प्रतीक' असलेल्या ताजमहलच्या साक्षीनं भेटावं. ते संकेतस्थळ साहिरला मात्र मान्य नाही. तो म्हणतो,

***ताज तेरेलिये इक मझहरे उल्फत ही सही***

***मेरी महबूब, कहीं और मिला कर मुझसे...***

प्रिये, तुला हा ताजमहल म्हणजे प्रेमाचं द्योतक वाटत असेलही, पण तरीही आपण दुसरीकडे कुठेतरी भेटत जाऊ या.....

***अनगिनत लोगोंने दुनियामें मोहब्बत की है***

***कौन कहता है कि सादिक न थे जज्बे उनके***

*लेकिन उनके लिए तशहीर का सामान नहीं*

*क्योंकि वो लोग भी अपनीही तरह मुफलिस थे....*

---अगं ! जगात असंख्य लोकांनी प्रेम केलं आहे. कोण म्हणतं की त्यांचं प्रेम खरं नव्हतं? किंवा शाहजहाँ प्रमाणे उत्कट नव्हतं? पण काय आहे माहीतय् का? त्यांच्याजवळ त्या प्रेमाची 'जाहिरात' करण्याचं कुठलंही साधन नव्हतं. कारण ते लोक तुझ्या-माझ्यासारखे निर्धन होते... गरीब होते.

*मेरी महबूब! उन्हें भी तो मोहब्बत होगी*

*जिनकी सन्नाई ने बख्शी है इसे शक्ले-जमील*

*उनके प्यारोंके मकाबिर रहे बेनामो-नमूद*

*आजतक उनपे  जलाई न किसीने किंदील....*

---प्रिये, ज्या(कारागिरांनी) ह्या ताजमहलाला एवढं सुंदर रूप दिलं त्यांनीही तर कोणावर तरी प्रेम केलं असेलंच ना! त्यांच्याही प्रिय व्यक्तींच्या कबरी असतीलच कुठेतरी.. सर्वांना अज्ञात, अशा जागी. कुणी दखलही घेत नसेल कबरींची, मग त्यावर एखादा दीप लावणं तर दूरच...

*ये चमनजार, ये जमनाका किनारा, ये महल*

*ये मुनक्क़श दरोदीवार, ये मेहराब, ये ताक*

*इक शहेनशाह ने दौलतका सहारा लेकर*

*हम गरीबोंकी मोहब्बतका उडाया है मजाक...*

*मेरी महबूब कहीं और मिला कर मुझसे.....*

---यमुनेच्या तीरावरचं हे शाही उद्यान, हा ताजमहाल, ह्या नक्षीदार भिंती आणि महिरपी कमानी! केवढं वैभवशाली हे सगळं दृष्य! पण मला वाटतं, एका सम्राटानं संपत्तीचा आधार घेऊन ताज बांधून केवळ आपणां गरिबांची खिल्ली उडविली आहे, दुसरं काही नाही... म्हणूनच आपण दुसरीकडे कुठेतरी भेटू या....

ताजमहल या कवितेनं धमाल उडवून दिली व साहिर काव्यप्रेमींच्या गळ्यातील ताईत बनला. ताजमहलकडे पाहण्याचा सर्वसाधारण दृष्टिकोन आश्चर्याचा व त्याच्या सौंदर्यापुढे नतमस्तक होण्याचा असा होता. त्याला छेद देणारे व दुसरा पैलू मांडणारे विचार साहिरनं प्रथमच मांडले होते. त्यानंतर आणखीही कवींनी ताज वर कविता केल्या, पण साहिरच्या 'ताजमहल' ची सर कशालाही नाही. अशारीतीनं ताजमहल हे साहिरचंच स्मारक झालं आहे ! निदान काव्य-रसिकांपुरतं तरी !

आता तुम्ही ताजमहल पाहायला जाल तेव्हा तुम्हाला साहिरची आठवण होईलच, त्याचबरोबर त्या अज्ञात कारागिरांचीही होईल ना? होईलच, मला खात्री आहे!

तळागाळातल्या लोकांबद्दलही मनात करुणा बाळगण्याचा संदेश ही कविता देते, नाही का?

आज कॉलेज मध्ये जाणाऱ्या मेघनाला जेव्हा ही कविता समजावून दिली, तेव्हा ती सुध्दा आश्चर्यचकित झाली व साहिर च्या प्रतिभेने दिपून गेली. महान साहित्य हे कालातीत असतं, हेच खरं ! !

# निरागस प्रेम......

ती एक जाहिरात तुम्ही टी. व्ही. वर पाहिली आहे ना? एक मुलगा सोफ्यावर पहुडला आहे.. सायकलच्या घंटीचा आवाज ऐकून पग जातीचा कुत्रा त्या मुलाला टी-शर्ट ओढून उठवतो... सायकलवरून त्याची आवडती मुलगी तिथून जाते..

दुसऱ्या जाहिरातीत तीच दोघं जिन्याच्या लँडिंग मधे बोलत बसलेली असतात... एक सेल्समन एक बॉक्स घेऊन येतो... पण हे पग त्याच्यावर भुंकून त्याला थोपवतं..... व्होडाफोनच्या जाहिरातीतील त्या दोघांचं प्रेम किती कोवळं व निरागस दाखवलंय नाही? ती जाहिरात पाहिल्यापासून एक गोष्ट सारखी आठवतेय मला. तीच तुम्हालाही संगायचीय. वाचा तर....

खूप वर्षांपूर्वीची गोष्ट. दिल्लीच्या चांदणी चौकाजवळ त्यावेळी एक झोपडपट्टी होती. त्यात एक मुस्लिम कुटुंब रहायचं. चार मुली आणि आई-वडील. वडिलांची थातुर-मातुर नोकरी. त्यातही धरसोड. त्यामुळे सर्वांना गरिबीचे चटके सहन करावे लागत होते. मोठी मुलगी पाच-सात वर्षांची. बाकीच्या त्याहून लहान ! पण ही मोठी मुलगी दिसायला फार गोड होती. बाकीच्याही चांगल्या होत्या, पण हिचा नूर काही वेगळाच होता. वर्ण गोरा तर होताच पण त्यावर एक तांबूस छटा होती. एखाद्या परीसारखी दिसायची ती. आई-वडिलांना वाटे, कसे वाढवावे यांना? जिवाला घोर !

जवळच किराणा मालाचं दुकान होतं. हातात पैसे आले की तेव्हढ्यापुरते खाण्याचे जिन्नस विकत आणायचे. रोजच मोठ्या बेबीला ते काम करावं लागे. सकाळी ती न चुकता तिकडे जायची. अगदी त्याचवेळी एक मुलगा शाळेच्या

बससाठी तिथे येऊन उभा रहायचा. तिच्यापेक्षा 2-3 वर्षांनी मोठा असेल. बरेचदा तो तिच्याकडे बघून हसायचा. ही गोरी गोरी सुंदर मुलगी त्याला खूप आवडायची. भीड चेपली तेव्हा तो तिच्याशी बोलू लागला.

"तुझं नाव काय? "

"मुमताज. तू शाळेत जातोस ना? "

"हो. आणि तू? "   मानेने नाही सांगत ती म्हणाली,

"आम्ही गरीब आहोत ना, म्हणून शाळेची फी परवडत नाही आम्हाला"

"तुम्ही कुठे राहता? " त्यानं विचारलं, तेव्हा ती उत्तरली, "पलीकडच्या झोपडपट्टीत"

एका दिशेकडे बोट दाखवून तो म्हणाला, "मी त्या बंगल्यात राहतो. माझं नाव लतीफ. "

हळूहळू संवाद वाढू लागला. दोघांना एकमेकांशी गप्पा मारायला आवडू लागलं. ओढ वाटू लागली. पण त्यात एक निरागसपणा होता.

कळत काहीच नव्हतं, पण एक दिवस तो म्हणाला, " मला तू खूप आवडतेस. तू एंजल सारखी दिसतेस... मी खूप शिकेन. तू... म्हणजे आपण मोठे झालो ना की आपण लग्न करू. चालेल? "

तिनंही खुद्कन हसून हो म्हटलं. त्यानं हळूच तिच्या गुलाबी गालाला स्पर्श केला. ती हरखून गेली... दिवसभर ती विलक्षण आनंदात होती... जणू तरंगत होती.

पण काय झालं कुणास ठाऊक ! दुसऱ्याच दिवशी मुमताज सह सगळं कुटुंब दिल्ली सोडून मुंबईला जायला निघालं. ! परत न येण्यासाठी !कारण काय ते मुमताजला माहीतच नव्हतं. मुंबईला पोहोचल्यानंतर तिला कळलं, तिचे अब्बाजान तिला  सिनेमात काम मिळावं यासाठी घेऊन आले होते. फार थांबावं लागलं नाही. एंजल सारख्या या मुलीला नवव्या वर्षीच कॅमेऱ्यापुढे उभं रहावं लागलं. तिथून पुढे तिनं मागे वळून पाहिलंच नाही. अनेकांनी तिच्यावर प्रेम केलं. पण ती लतीफला केव्हाच विसरू शकली नाही. कारण ते होतं विशुध्द निरागस पहिलं प्रेम! त्याला वासनेचा ओंगळ स्पर्शही नव्हता. !!

ही मुमताज कोण ते आलं लक्षात? सौंदर्यसाम्राज्ञी मधुबाला !! जिच्या सौंदर्याला तोड नव्हती व आजही नाही...... असं म्हणतात, 2000 साली जगतिक पातळीवर झालेल्या संशोधनानुसार सर्वाधिक सुंदर नटी असण्याचा मान मधुबालेलाच मिळाला. मृत्यूनंतर चाळीस वर्षांनीही ! सुप्रसिध्द नटी मेरिलीन मन्रो च्याही वरचं स्थान तिला मिळालं. 1969 साली जेव्हा ती मेली, तेव्हा लतीफ ढसाढसा रडला होता.........

मधुबालेबद्दल खूप काही जाणून घ्यायचं असेल तर..... पुढच्या एखाद्या भागात !

# कवितांची कविता—गझल

आज मराठी गझलबद्दल अधिक जाणून घेऊ या. गझल हा एक काव्यप्रकार आहे. जसे सुनीत, लावणी, अभंग, पोवाडा इ. काव्यप्रकार आहेत तसाच हाही. मूळचा अरबी-फारसी व नंतर उर्दूतून हा काव्यप्रकार आपल्याकडे आला. नंतर इतर अनेक भाषांमध्येही गझल लिहिली जाऊ लागली. तशी ती मराठीतही आली. एक गझल आधी वाचू या.

मुळी न केला विचार तेव्हा
खुशाल केला करार तेव्हा... 1

नकोच होता घडावया जो
घडून गेला प्रकार तेव्हा... 2

अशी कशी हारले कळेना
न खेळताही जुगार तेव्हा... 3

जपून मी ठेविला मनाशी

तुम्ही विचारू नका खुशाली
तुम्हीच केलेत वार तेव्हा... 6

तुझ्याकडे यायचेच आहे
करू नको बंद दार तेव्हा.... 7

मला हवा तो दिसे न तारा
नभात होते हजार तेव्हा... 8

अजून ही कंप पावते ती

दिलास जो तू नकार तेव्हा.. 4

मला खरे वाटलेहि होते

तुझे बहाणे हुषार तेव्हा... 5

तुवा स्पर्शिली सतार तेव्हा.. 9

(वृत्त—जलौघवेगा)

संगीता जोशी.

या गझल मध्ये नऊ द्विपदी (शेर)आहेत. एका कडव्याला शेर असे म्हणायचे. गझल हे वृत्तबध्द काव्य असते. मुक्तछंदात गझल लिहीत नाही. सर्व शेरांमध्ये एकच वृत्त असते. शालेय अभ्यासात, शार्दूलविक्रीडित, भुजंगप्रयात इ. नावे आपल्या कानांवरून गेली आहेत. तशी गझलचीही अनेक वेगवेगळी वृत्ते आहेत. वरील गझलेच्या वृत्ताचे नाव जलौघवेगा असे आहे. मुख्य म्हणजे, गझलमधील प्रत्येक शेर अर्थाच्या दृष्टी ने स्वतंत्र असतो. एखाद्या शेराचा अर्थ मागच्या किंवा पुढच्या शेरावर अवलंबून नसतो. दोन ओळी हीच एक कविता असते. म्हणूनच गझलला "कवितांची कविता" असे म्हटले जाते.

वरील गझल वाचून पाहा, प्रत्येक दोन ओळीत एक संपूर्ण विचार मांडला आहे. सगळे शेर वाचतांना कळते की प्रत्येक शेरात, विचार, करार, जुगार, हुषार इ. समउच्चारी शब्द आले आहेत. पहिल्या शेरात ते दोन्ही ओळीत तर पुढल्या प्रत्येक शेरामध्ये दुसऱ्या ओळीत आले आहेत. यांनाच यमक (काफिया) असे म्हणतात. यमकानंतर प्रत्येक वेळी "तेव्हा" हा शब्द आला आहे, त्याला रदीफ असे म्हणतात. हेच गझलचे सौंदर्य असते. वृत्तबध्द असल्याने ती ठेका देऊन वाचता येते व समान उच्चारांच्या शब्दांमुळे वाचायला मजा येते. वरील गझलचे वृत्त " रनार नाना, रनार नाना" या ठेक्यात वाचता येईल. तसे वाचून बघा, नक्कीच मजा वाटेल.

अर्थात, केवळ ही मजा म्हणजे गझल नव्हे. प्रत्येक शेरात आशय असलाच पाहिजे ! नाहीतर गझल म्हणजे नुसता सांगाडाच होईल. त्यात आशायाचा आत्मा हवाच. तसा आत्मा नसेल तर ती कविता नव्हेच! तो आशय दोनच ओळीत कसा सामावता येतो हे कवीच्या प्रतिभेवर अवलंबून आहे. म्हाणूनच नुसता गझलेचा आकृतीबंध समजला की गझल लिहिता येते असे नाही. प्रतिभा पाहिजेच, जी उपजतच असावी लागते.

आता हे सर्व समजून पुन्हा वरील गझल वाचा व तिच्या वाचनातून आनंद मिळतो का, ते पाहा. मला खात्री आहे की तुम्हाला गझल हा प्रकार नक्की आवडू लागेल.

आणखी ही गझला पुन्हा केव्हातरी.....

# गुलोंमें रंग भरे.....

आज एक दुःखद बातमी कानावर आली आणि मन भूतकाळात गेलं. सत्तरीचे दशक असेल. माझे वडील मला सांगत आले, "आज एका पाकिस्तानी गायकाचं गाणं ऐकून आलोय्, रेडिओवर ! तुला आवडते ना, तशी ती गझलच होती बहुतेक ! पण काय आवाज होता त्याचा ! मऊ रेशमी मुलायम !"

"नाव काय त्याचं? " मी विचारलं. "मेहेंदी हसन. तो आधी ठुंबरी गायचा, म्हणे. पण आता गझलच जास्त गातो. "

(त्याचं नाव मेहेंदी नसून मेहदी आहे हे नंतर कळलं. ) मी लक्ष्मी रोडला पत्कींच्या पूना म्युझिक मध्ये चौकशी केली. पण त्यांना नावही माहीत नव्हतं. पण काही दिवसांनी त्यांच्या दुकानातला मुलगा निरोप घेऊन आला, "तुम्हाला पाहिजे ती रेकॉर्ड आली आहे. "

पत्कींनी ती मला मोफत ऐकवली. माझा आनंद मात्र अनमोल होता !

**गुलोंमें रंग भरे बादे-नौबहार चले**

**चले भी आओ कि गुलशन का कारोबार चले....**

ऐकतांना भान हरपून गेले होते. कवीचं नाव होतं फैज अहमद 'फैज". ते गाणं-गझल- कुठल्याशा एका पाकिस्तानी फिल्म साठी त्यांनी गायलं होतं.

काही काळानंतर बाजारात कॅसेट्स् आल्याची माहिति मिळाली. मेहदी हसन ची पहिली कॅसेट घरात आली. पण टेप-रेकॉर्डर-प्लेअर कुठे होता? चौकशी केली तर खूप महाग होता. पॅनासोनिकचा. एकमेव मॉडेल. पियानोसारख्या

बटनांचा. अडीचशे रुपये पगार अन् त्याची किंमत पंधराशे ! त्याकाळी!! पण रसिक मनाला त्या आवाजाची ओढ होती. केवळ हौस नव्हती. शेवटी हिय्या करून खरेदी केली. आणि मेहदी हसन यांच्या सुरांनी घर व मन भरून पावलं.

मेहदी हसन प्रथम ठुंबरी व क्लासिकलच्या मैफली करत असत. पण गझलगायकीला त्यांनी असं काही नवं रूप दिलं की पुढे गझल हीच त्यांची ओळख झाली. एका हमालानं, ऐपत नसतांना "गुलोंमें रंग... " साठी ती फिल्म 20-25 वेळा पाहिली होती म्हणे!

पुढे काही वर्षातच त्यांना गझलचा शहेनशहा असं म्हटलं जाऊ लागलं. ऐंशीच्या दशकात त्यांची मैफल पुण्याला होणार होती, तेव्हा त्यांच्या भेटीचाही योग आला. मी व माझा मुलगा अभिजित, (तो तेव्हाही उर्दूचा चांगला जाणकार होता, ) दोघे त्यांना भेटलो. त्यांच्या गझलांवर थोडी चर्चा झाली. भारतातच माझे जास्त 'फॅन्स' आहेत असे त्यांनी आवर्जून सांगितले. तेव्हाही त्यांच्यासोबत मोठा लवाजमा होता. त्यांचे कुटुंब. त्यांच्या दोन छोट्या नाती खूप सुंदर व गोड होत्या. आम्ही त्यांच्यासोबत खूप फोटोही काढले. माझे वडील "सवाई गंधर्व उत्सवाचे" आयोजन करणाऱ्या आर्य संगीत प्रसारक मंडळाचे संस्थापक सदस्य असल्याचं कळल्यावर तो उत्सव पाहायला त्यांना यायचंय् असं ते म्हणाले होते. बेगम अख्तर यांचे गझल-गायन उत्सवात एकदा झाले होते. पण हसन साहेबांचा योग काही आला नाही.

अमेरिकेत डेन्व्हरला त्यांची एकॅडमी पाहाण्याची संधी आली होती. पण त्यावेळी ते नेमके पाकिस्तानात गेले होते.

दोन-तीन वर्षापूर्वी त्यांचे चिरंजीव आसिफ यांचे प्रोग्राम्स भारतात मुद्दाम आयोजित करण्यात आले होते. उद्देश होता मेहदी हसन यांना आर्थिक मदत व्हावी. औषधपाण्याचा खर्च भागवता यावा. चाहत्यांनी भरभरून हात दिला हे

वेगळे सांगायला नकोच. पुण्यातल्या त्यांच्या कार्यक्रामांना मी गेले होते. तेव्हापासूनच त्यांच्या प्रकृतीची काळजी होतीच. शेवटी व्हायचे ते झालेच.... !! युगामधूनच अशा दैवी आवाजाची कृपा एखाद्यावर होत असते. त्या सुरांनी कित्येकांच्या जीवनात आनंद निर्माण केला... शायरांच्या गझलेत लपलेल्या दुःखाला आपल्या स्वरांची भर्जरी किनार लावून मैफिली, सीडीज् सारख्या तबकातून पेश करून रसिकांना आनंदाचे नजराणे दिले.... अशी व्यक्ती कुठल्या देशाची आहे, कुठल्या धर्माची आहे असे संकुचित विचार येण्यास जागा तरी राहते का?

भारत-पाक संबंधाबाबत आम्ही गमतीने म्हणायचो, की दोन्ही डेलिगेट्स् चे प्रमुख जर मेहदी हसन व लतामंगेशकर असतील ना, तर प्रश्न सामंजस्याने, चुटकीसरशी सुटेल यात शंकाच नाही !!....

पण ते जाऊ दे... ! आता फक्त सूर मागे रहिले आहेत....

दिलसे धुआँ और आँखोंसे आँसू निकलते हैं....

# प्रेम

सध्या झी. मराठी चॅनल वर चाललेली "एका लग्नाची दुसरी गोष्ट" ही मालिका खूपच लोकप्रिय आहे. देश-परदेशातील मराठी माणसं ती बघतात. या मालिकेचा नायक घना(घनःश्याम) याच्या तोंडी एक वाक्य आहे, "या जगात सगळ्यात सुंदर, सगळ्यात महत्त्वाची अशी एकच गोष्ट आहे, ती म्हणजे प्रेम !!"

तुम्ही आम्ही सर्वजण घनाशी सहमत होणार हे नक्की. प्रेम ही जगायला बळ देणारी ऊर्जा आहे, शक्ती आहे. ती अदृश्य असते. म्हणजे शरीरात (म्हणजे हृदयात /मेंदूत) अशी काही दाखवता येत नाही. सगळ्या शक्तिमान गोष्टी अशा अदृश्यच असाव्यात असा सृष्टीचा नियमच आहे की काय, कोणास ठाऊक. इथे मला अणूची आठवण होते. अणूसुध्दा प्रचंड शक्तिवान पण तोही कोणी पाहिला नाही. आणि आत्ताच सापडलेला "हिग्ज बोसॉन कण" तोही तसाच ! तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे, "अणुरणिया थोकडा तुका आकाशाएवढा!" अवघ्या जगाला व्यापूनही जे उरतं ते प्रेम ही असंच आहे. ते दिसत नाही पण व्यक्त मात्र होतं.

प्रेम शब्दाचा उच्चार करताच प्रथम आपण त्याचा संबंध तारुण्यातलं प्रियकर-प्रेयसी यांच्यातील प्रेमाशीच लावतो. ते साहाजिकच आहे म्हणा. पण ते प्रेमाचं एक रूप झालं. त्या किंवा पतिपत्नी च्या प्रेमाला अनुराग म्हणतात. या एका प्रेमावर पूर्वीची उर्दू शायरी बऱ्याच प्रमाणात अवलंबून होती. तो गालिबचा शेर ऐकलाच असेल तुम्ही.

***इश्क ने 'गालिब' निकम्मा कर दिया***

***वरना हम भी आदमी थे काम के.....***

अर्थ- आम्ही प्रेमात पडलो, प्रेमाशिवाय दुसरं काहीही करायला नालायक ठरलो. कारण दुसरं काही सुचतच नाही ना! नाहीतर आम्हीही दाखवलं असतं आमचं कर्तृत्व.

जिगर मुरादाबादी काय म्हणतात पाहा,

***इक लफ्जे-मुहब्बत का अदना सा फसाना है***

***सिमटे तो दिले-आशिक, फैले तो जमाना है....***

प्रेम ही एक अगदी छोटीशी गोष्ट आहे. इतकी छोटी की प्रेमिकाच्या हृदयात ती सामावून जाते. पण हीच छोटी गोष्ट एवढी मोठी आहे की ती विस्तारली तर साऱ्या जगाला व्यापून टाकते.

मीर तकी मीर ह्या शायराची मुलगी 'बेगम' या टोपण नावाने शायरी लिहायची. तिचा एक शेर असा आहे.

***इस इश्क की हिम्मत से मैं सदके हूं कि 'बेगम'***

***हर वक्त मुझे मरने पे मुझे तैय्यार तो रक्खा....***

प्रेमाची ताकद एव्हढी की त्यावरून मला जीव ओवाळून टाकावासा वाटतो. त्याच्यामुळे माझ्यातही  सामर्थ्य आलंय्. मृत्यू पत्करायला मी सदैव तयार राहिले. (मरणयातना भोगण्याची हिंमत माझ्यामधे निर्माण झाली. )

जुनी उर्दू शायरी ही बहुतांश असफल प्रेमामुळेच निर्माण झालेली आढळते. शायराची सौंदर्यवती प्रेयसी आणि त्याची तिने केलेली उपेक्षा, हे शायरीचे मुख्य विषय बनून गेले होते.

मीरचा एक शेर पाहा,

*दिखाई दिये यूं कि बेखुद किया*

*हमें आपसे भी जुदा कर चले....*

तिचं दर्शन आम्हाला झालं आणि आम्ही भानच हरपलो. जणू बेशुध्दच झालो. एव्हढंच नाही, तर ती गेली तर आमचं अस्तित्वच बरोबर घेऊन गेली. आमच्यातला आत्माच तिच्याबरोबर गेला !

ह्या शेराला एक गर्भितार्थही आहे, की हे ईश्वरा, मला जेव्हा तुझं दर्शन झालं तेव्हा माझ्या सर्व इंद्रियांच्या जाणिवाच नष्ट झाल्या. तू प्रकट झालास व माझ्यातील मी निघून गेला.

ही मात्र प्रेमाची सर्वोच्च स्थिती होय. परमेश्वराशी निगडित होण्याची स्थिती. त्याच्याशी एकरूप होण्याची अवस्था. भक्ती ही सुध्दा प्रेमाचीच पायरी आहे. पण त्यातही द्वैत शिल्लक उरतंच. म्हणून शेवटची अवस्था परमप्रेम. यात द्वैत संपतं. ईश्वरा, तू म्हणजेच मी आणि मी म्हणजेच तू.

असं म्हणतात, कृष्ण जेव्हा गोकुळ सोडून मथुरेला निघाला, तेव्हा तमाम गोकुळवासी रडत होते. फक्त राधा याला अपवाद होती. कृष्णाने तिला जाऊन विचारले, "तुला दुःख होत नाही मी चाललो आहे याचं? "

तेव्हा तिनं उत्तर दिलं, "तू दूर जाऊच  कसा शकशील? कारण तू आणि मी वेगळे थोडेच आहोत? " हे खरं दिव्य प्रेम ! Divine Love !!

आपण सर्वजण प्रेम करतच असतो. आईवर, मित्रमैत्रिणींवर, मातृभूमीवर... आणखीही प्रेमाच्या इतर जागा असतात. कले वर(एखादी कला), भाषेवर... यादी वाढत राहील..

पण ही सगळी त्या दिव्य प्रेमाचीच रूपे आहेत. पण म्हणून ही सगळी प्रेमाची रूपं आपल्या मनात असली म्हणजे आपण ईश्वरावरच अप्रत्यक्ष प्रेम करत आहोत असे होत नाही. जसं, फर्निचर लाकडापासून बनविलेलं असलं, तरी ते एकत्र करून मूळ झाड तयार होणार नाही, तसं ! म्हणून दिव्य प्रेमाची अनुभूती स्वतःच स्वतंत्रपणे घ्यावी लागते....

# प्रेम की..... प्रे.....?

प्रेम ही खरोखर अद्भुत गोष्ट आहे, कारण त्या अदृश्य धाग्यात हृदयांना एकत्र बांधण्याची ताकद आहे. सृष्टीनिर्मिती मागे हिग्जबोसॉन कण आहेत येथ पर्यंत शास्त्रज्ञ नुकतेच येऊन पोहोचले आहेत. प्रेम या शक्तीचा उगम... स्रोत कोठे असेल? जाऊ दे. मनाशी त्याचा संबंध आहे, ही माहिती पुरेशी आहे. मानवाखेरीज इतर प्राण्यांमधेही 'प्रेम' भावना दिसतेच. पाळीव प्राणी ते सिध्द करतातही. एवढंच नाही, तर झाडे-वृक्षांनाही ते समजते व ते प्रतिक्रियाही देतात, हे जगदीश्चंद्र बोस यांनी प्रयोगाने दाखवून दिले होते. याही पलीकडची उदाहरणे आहेत. जळगावचे डॉ. पूर्णपात्रे यांनी सिंहाच्या मादीपिल्लाला घरी आणून वाढविले होते. ते अनाथ पिलू त्यांना जंगलात सापडले होते. ती सिंहीण मोठी झाल्यावर(तिचे नाव सोनाली. याच नावाचं त्यांनी लिहिलेलं पुस्तक जरुर वाचा. ) त्यांनी तिच्या व लोकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तिला त्यावेळी पेशवे पार्क, पुणे येथे सोडले होते. पुढे डॉक्टर जेव्हा जेव्हा तिला भेटण्यास येत व सोनाली अशी हाक मारत, तेव्हा ती त्यांना ओळखत असे, त्यांच्या जवळ येत असे व प्रेमाने त्यांचे हात चाटत असे. अनेक लोकांनी हे दृश्य पाहिले आहे. ती मरेपर्यंत त्यांना विसरली नाही !!

वाईट याच गोष्टीचं वाटतं, की हिंस्त्र प्राणीही प्रेमाने वश होतात, मग मानवच आज प्रेम विसरून हिंस्त्र का झाला आहे? बारकाईने पाहिलं तर, प्रेमाच्या अभावामुळेच आज लढाया, युध्दे, दहशतवाद हे परिणाम जगभर दिसत आहेत. एकाच आदमची किंवा मनूची ही प्रजा आज एकमेकांच्या जिवावर कशी उठू शकते? विश्वबंधुत्व समजावून घेऊन प्रेम जोपासण्याऐवजी सगळीकडे विध्वंस का

फोफावला आहे? विचारशील माणसाचं हृदय हेलावून जातं ! सामान्य माणूस फक्त हतबल होतो, कवीचं कोमल हृदय मात्र प्रभावी शब्दात मन उघडं करतो.

कवी प्रदीप (ऐ मेरे वतन के लोगो... हे अजरामर गीताचे कवी) यांचं एक गीत फारच अस्वस्थ करून जातं. ते त्यांनी लिहिलं तो काळ हिंदुस्थानच्या फाळणीनंतरचा असावा. पण त्यात वर्णन केलेली माणसाची दुर्दशा आजही बहुतांशी तशीच आहे, कारणं काहीही असोत !! ती कविता इथे वाचा.....

आज इन्सानको ये क्या हो गया, इसका पुराना प्यार कहाँ खो गया... धृ.

कैसी ये मनहूस घडी है, भाइयोंमें जंग छिडी है
कहींपे फूल कहींपर ज्वाला, जाने क्या है होनेवाला
सबका माथा आज झुका है, आजादीका जुलूस रुका है
चारोंओर दगाहि दगा है, हर छुरेपर खून लगा है
आज दुखी है जनता सारी, रोते हैं लाखों नरनारी
रोते हैं आँगन गलियारे, रोते आज मुहल्ले सारे
रोती सलमा रोती है सीता, रोते हैं कुर्रान ओ गीता
आज हिमालय चिल्लाता है, कहाँ पुराना वो नाता है?

डस लिया सारे देशको जहरी नागोंने, घरको लगा दी आग घरके चिरागोंने... 1

अपना देश वो देश था भाई, लाखोंबार मुसीबत आई

इन्सानोंने जान गँवाई, पर बहनोंकी लाज बचाई

लेकिन अब वो बात कहाँ है, अब तो केवल घात यहाँ है

चल रही हैं उल्टी हवाएं, काँप रही थरथर अबलाएं

आज हरेक आँचलको है खतरा, आज हरेक घूंघटको है खतरा

खतरेमें है लाज बहनकी, खतरेमें चुडियाँ दुल्हनकी

डरती है हर पाँव की पायल, आज कहीं हो जाए न घायल

आज सलामत कोइ न घर है, सबको लुट जाने का डर है

हमने अपने वतनको देखा, आदमीके पतनको देखा

आज तो बहनोंपर भी हमला होता है, दूर किसी कोनेमें मजहब रोता है..... 2

किसके सर इल्जाम धरें हम, आज कहाँ फरियाद करें हम

करते हैं जो आज लडाई, सबके सब हैं अपनेहि भाई

सबके सब हैं यहाँ अपराधी, हाए मुहब्बत सबने भुला दी

आज बही जो खूनकी धारा, दोषी उसका समाज है सारा

सुनो जरा ऐ सुननेवालों, आसमाँ पर नजर घुमा लो

एक गगन में करोडों तारे, रहते हैं हिलमिलके सारे

कभी न वो आपसमें लडते, कभी न देखा उनको झगडते

कभी नहीं वो छुरे चलाते, नहीं किसीका खून बहाते

लेकिन इस इन्सान को देखो, धरतीकी संतान को देखो

कितना है ये हाय कमीना, इसने लाखोंका सुख छीना

की है इसने जो आज तबाही, देंगे उसकी ये मुखडे गवाही

आपसकी दुष्मनीका ये अंजाम हुआ, दुनिया हसने लगी देश बदनाम हुआ.... 3

कैसा ये खतरेका पहर है, आज हवाओंमें भी जहर है

कहीं भी देखो बात यही है, हाय भयानक रात यही है

मौत के सायेमें हर घर है, कब क्या होगा किसे खबर है

बंद है खिडकी बंद हैं द्वारे, बैठे हैं सब डरके मारे

क्या होगा इन बेचारोंका, क्या होगा इन लाचारोंका

इनका सबकुछ खो सकता है, इनपे हमला हो सकता है

कोई रक्षक नजर न आता, सोया है आकाश पे दाता

ये क्या हाल हुआ है अपने संसारका, निकल रहा है आज जनाजा प्यारका..... 4

खरंच का आज प्रेमाची प्रेतयात्रा निघाली आहे? .....

यासाठीच मला ही कविता तुमच्यापर्यंत न्यायची होती, की कवीने कळकळीने ही त्याची वेदना आपल्या साध्या पण उत्कट शब्दात व्यक्त केली आहे. ही आपल्या सर्वांची वेदना आहे. काळ पुढे गेला असेल, पण कवितेत वर्णन केलेली परिस्थिती आजही तशीच आहे.

माणसा माणसांमधील प्रेम परत यायला हवं, प्रेम आणि प्रेत, हे केव्हढे जवळचे शब्द !! पण त्यांना दूर करायला हवं. म च्या जागी त येता कामा नये. आपण जागे होऊ या. कवी प्रदीप ना आपण धन्यवाद देऊ या त्यांनी आपल्याला सावध केलं आहे.......

## एक मैफल...

तुम्ही शास्त्रीय संगीताची मैफल कधीतरी नक्कीच ऐकली असेल. अशा मैफलींचा शेवट भैरवी ने होतो ही प्रथाही तुमच्या परिचयाची असेल. पण एखाद्या मैफलीची सुरवातच जर भैरवीने झाली तर? तरीही छानच वाटते ! मी ऐकलीय् अशी मैफल. पण ती उर्दू गझलची. गायिका होती आबिदा परवीन. आवाज लागेपर्यंत तिने थोडावेळ यमनकल्याण आळवला. "येरी आली पियाबिन" ही पारंपारिक चीज ऐकतांना दोन देशातील अतूट सांस्कृतिक बंधाची सुखद जाणीव होत होती. पण उत्सुकता होती ती भैरवीतल्या त्या परिचित गझलेची.

ताणलेली उत्सुकता शिगेला पोहोचल्यावर आबिदा परवीन ने तार षड्ज लावून पुढील ओळी म्हटल्या...

**आप गैरोंकी बात करते हैं, हमने अपने भी आजमाये हैं**

**लोग कांटोंसे बचके वलते हैं, हमने फूलोंसे जख्म खाये हैं....**

यमन-कल्याण ऐकतांना स्तब्धतेने ऐकणारे श्रोते एकदम उसळून दाद देऊ लागले... मला वाटतं एखादा शेर आपल्याला आवडतो कारण त्यात कुठेतरी आपलीच अनुभूती लपलेली असते. त्यामुळेच शब्द काळजाला जखम करतात आणि सूर त्यावर फुंकर घालतात.... काट्यांमुळे जखमा होतील हे निदान माहीत तरी असतं, पण जिथं काही धोका वाटत नाही अशा ठिकाणाहून... फुलांकडून.. जखमा झाल्यावर वेदना अधिक होतात...

एका शेरात आपण हरवून जातो, तोच आबिदा दुसरा शेर म्हणते,

**किसीका क्या जो कदमोंपर जबीने-बंदगी रख दी**

**हमारी चीज थी, हमने जहां चाही वहां रख दी....**

खरंय् न? आपलं मस्तक आहे, आपण ते कुठेही ठेवू !! ते कोणाच्या चरणी ठेवावं हे दुसरे लोक का म्हणून ठरवणार? आपल्याला वाटेल तिथे आपण ते ठेवू शकतो !

यातील गर्भितार्थ लक्षात घ्यायला हवा. कशाची पूजा करायची हे स्वातंत्र्य व अधिकार त्या त्या व्यक्तीचा असतो. ती पूजा कशाचीही असू शकेल.. एखाद्या प्रिय व्यक्तीची, प्रिय दैवताची, कामाची, व्यवसायाची किंवा देशाची... कोणी पैशाचीही म्हणेल.. !आपल्या विचारांनुसार आपलं श्रध्दास्थान बदलेल... हेच या शेरात सुचवलं आहे.

मुख्य गझलेच्या आधी असे काही पोषक शेर म्हणण्याची गझल-मैफलीची रीतच आहे. नंतर आबिदानं गझलेचा पहिला शेर सादर केला.

**जबसे तू ने मुझे दीवाना बना रक्खा है**

**संग हर शख्स ने हाथोमें उठा रक्खा है....**

या शेरातला 'मी' प्रेयसीला म्हणत आहे, की मी तुझ्या प्रेमात पडलोय्... फक्त पडलो नाही तर अगदी पागल झालोय्.. आणि वेड्याला पाहिल्यावर लोक जसे त्याच्या अंगावर, दगड घेऊन मारायला धावतात, तसे लोक माझ्याकडे धावत येताहेत, प्रत्येकाच्या हातात मला दिसताहेत दगड !

या शेराचा सखोल विचार करायला हवा. एखाद्या व्यक्तीने एखाद्या गोष्टीचं वेड घेतलेलं दिसलं की सामान्य लोक त्याची संभावना खुळचट अशीच करतात. इतिहासाच्या अभ्यासकाला ते म्हणतील, " ते अमुक-अमुक ना, स्वतःला 'राजे' च समजतात "!असे उपेक्षेचे दगड त्या व्यक्तीवर विनाकारण फेकले जातात.

देवावर श्रध्दा असणाऱ्यांनाही काही लोक वेडे ठरवितात आणि देवाला रिटायर करा अशी दगडफेक ते करत असतात. "देव नाही" या विचारावर त्यांची ठाम ‘श्रध्दाच’असते, ही विसंगती त्यांच्या लक्षातही येत नाही. थोडक्यात काय, तर "दीवाना" या संज्ञेतून कोणाचीच सुटका नाही. वर वर पाहता प्रेम या विषयावर असलेल्या या शेराला अर्थाची कशी छटा आहे, पाहिलंत?

गझलेमधील प्रेमी इतका दुःखव्याकुळ झाला आहे की पूर्वी कोणीतरी प्रेमालाच 'शिक्षा' हे नाव दिलं होतं हे त्याला आठवतं. शेर असा आहे—

**उसके दिलपर भी कडी इश्कमें गुजरी होगी**
**नाम जिसने भी मुहब्बतका 'सजा' रक्खा है...**

---हे प्रेम म्हणजे आपल्याला मिळालेली शिक्षाच आहे असं जो म्हणतो, त्याच्यावर प्रेमामुळे कोणती परिस्थिती गुदरली असेल त्याची कल्पनाच करवत नाही !

किती कष्टमय असतं प्रेमिकाचं जिणं ! शिक्षा सोसून वर इतरांकडून दगडांचा वर्षावही सहन करायचा तो वेगळाच !गझलेतला पुढचा शेर आबिदा म्हणते,

**पत्थरों, आज मेरे सरपे बरसते क्यों हो**

**मैं ने तुमको भी कभी अपना खुदा रक्खा है....**

प्रेमिक म्हणत आहे, दगडांनो, आज तुम्ही का माझ्यावर असे निर्दयपणे बरसत आहात? विसरलात? काल तुमच्यापैकीच एकाला मी देव्हाऱ्यात बसवलं होतं... आणि पूजा केली होती... असं असतांना आज तुम्हीच माझ्यावर उलटलात?

असं पहा, दगडांना देवत्व बहाल करणारे आपणच असतो. अपात्र व्यक्तीला उच्चस्थानी बसवतांना विचार करायला हवा. हेच या दोन ओळीत समर्पकपणे सांगितलं आहे. शेवटल्या शेरात काय सांगितलं असेल? ही उत्सुकता श्रोत्यांच्या कानात गोळा होते.

**पी जा अय्यामकी तल्खी को भी हसकर 'नासिर'**

**गम को सहने में भी कुदरत ने मजा रक्खा है....**

कवी स्वतःलाच समजावीत आहे, "अरे नासिर, दुनियेतला हा सगळा कडवटपणा एखाद्या मधुर पेयाप्रमाणे आनंदाने पिऊन टाक. अरे, असं हसत हसत दुःख सहन करण्यातही नियतीनं एक वेगळंच सुख दडवून ठेवलंय् बघ. त्या सुखाचीही तू मजा घ्यावीस ! तो दुःखातला आनंद तुला मिळावा म्हणून तर हे दुःख दिलंय् तुझ्या वाट्याला. असा भाग्यवान आहेस तू !

दुःखातल्या आनंदाशी आपण पोहोचतो तेव्हा नकळत डोळे पाणावलेले असतात... तुमचेही डोळे ओलावलेत ना? मला खरंच ठरविता येत नाही की हा परिणाम कवीच्या ताकदीच्या शब्दांचा की भैरवीच्या करुण-मधुर स्वरांचा ! पण इथं तर फक्त शब्दांचीच मैफल जमली आहे! सूर ऐकायचे तर यू-ट्यूब वर आबिदा परवीन ला नक्की भेटा.....

# और कुछ देर ठहर.....

उजाडलंय्! पण चंद्र अजूनही पश्चिमेला कललेला दिसतोय्. मधुर रात्र कशी संपली कळलंच नव्हतं.. ! कळणार तरी कसं? प्रेमात बुडलेल्या दोन जीवांना सर्वस्व समर्पणाखेरीज दुसरं कशाचं भान असणार? काश्मीरचा रम्य प्रदेश, गुलाबी थंडी आणि फुलांचा वर्षाव करणारा धुंद मोसम... प्रेमी युगुलाला बेभान करणाऱ्या या अनुकूल वातावारणात प्रेमाची तहान वाढतच राहणार ना... त्याला तर सारं अपूर्णच वाटतंय् आणि तिला आता निघावंच लागणार आहे... मनात नसलं तरी... पाय निघत नसला तरी... कारण तिला तिचा समाज साद घालतोय्.. ती एक स्त्री.. तिला भानावर यावंच लागतं.. त्यालाही समजवावं लागतं... पण तो अजून त्याच्या स्वप्नमय दुनियेतून जागा व्हायला तयार नाहीए... ती जाऊ पहातेय् अन् तो तिला अडवतोय्....

**और कुछ देर ठहर, और कुछ देर न जा....**

**रात बाकी है अभी, रातमें रस बाकी है**

**पाके तुझको, तुझे पानेकी हवस बाकी है**

**और कुछ देर ठहर, और कुछ देर न जा.....**

ते दोन प्रेमी पुन्हा पुन्हा एकमेकांना नजरेत सामावून घेताहेत... तो पंचविशीतला राजेश खन्ना अन् ती इंद्राणी मुखर्जी....

**जिस्मका रंग फजा में जो बिखर जाएगा**

**मेहरबां हुस्न तेरा और निखर जाएगा**

**लाख जालिम है जमाना मगर इतना भी नहीं**

**तू जो बाहों में रहे, वक्त ठहर जाएगा**

**और कुछ देर ठहर, और कुछ देर न जा....**

ब्लॅक एण्ड व्हाईट मधला कोवळा तरुण राजेश.. त्याचा तो कट्स् पाडल्यासारखा रेखीव चेहरा.. आणि तरूणींना मोहवून टाकेल अशी प्रेमाची अदा... त्याचवेळी त्यानं अनेक सुंदरींची हृदयं जिंकली होती....

हा राजेश खन्नाचा पहिला रिलीज झालेला सिनेमा.. रंगित "आराधना" तर अजून यायचा होता. पण यशाची नांदी या "आखरी खत " नेच सुरू झाली होती ! ( याचं नाव मग 'पहेला खत' शोभलं असतं का? .... उगाच आपली शब्दक्रीडा... !) दिग्दर्शक चेतन आनंद नी नायक म्हणून राजेशला निवडतांना बराच विचार करून, दूरदृष्टी वापरली असावी.

त्या काळात देव आनंद फेस-लिफ्ट वगैरे करूनही उतरणीला लागला होता.. पडद्याला रोमँटिक हीरोची उणीव भासत होती... आणि राजेश त्या पडद्यावर फिट बसला... इंद्राणी गोड असलेल्या बोलक्या चेहऱ्याची नटी होती. पण ती नंतर नायिकेच्या भूमिकेत का दिसली नाही कोण जाणे... हे गाणं 1966 च्या काळातलं. गाण्याच्या सुरवातीवरून, त्या दोघांची सरलेली रात्र कशी गेली असेल याचा प्रेक्षकाला अंदाज येतो. पण सबंध गाण्यात कुठेही भडक शृंगार नाही.. हे विशेष. राजेश तर त्यावेळी नवाच होता त्यामुळे त्याचे मॅनेरिझम असे सेट झालेले नव्हते. पण झलक मात्र आज पाहतांना लक्षात येते... तू जो बाहोमें रहे... ही ओळ गातांना दोघे स्वाभाविक पणे जवळ येतात...

शेवटच्या कडव्यात कैफी आजमी लिहितात,

**जिंदगी अब इन्हीं कदमों पे लुटा दूं तो सही**

**ऐ हसीं बुत, मैं खुदा तुझको बना लूं तो सही**

**और कुछ देर ठहर, और कुछ देर न जा....**

मला माझं आयुष्य तुझ्या पायाशी वाहू तर दे ! तुला देवत्व देऊन मला समाधान तर मिळू दे, मग हवं तर जा.... पण आत्ता थांब ना. आणखी थोडावेळ तरी थांब ग !.... गण्यातल्या ह्या अखेरच्या आर्जवानंतर दहा पावलं लांब गेलेली ती परत फिरली नाही तरच नवल !... आणि हलक्याशा मिठीत हे गाणं संपतं..... नायक-नायिकेलाच काय आपल्यालाही हुरहुर लागते....

हा सिनेमा छान चालला. पण पहिल्या रन पेक्षा दुसऱ्या रनला धो-धो चालला. आगगाडीच्या दोन रुळांमधून एक बालक पाठमोरं चालतांना दाखविलेली ती छापील जाहिरात आजही आठवतेय्. राजेश खन्ना हे नाव ठळकपणे लक्षात राहिलं. तो चित्रपटसृष्टी गाजवणार हे भाकितही मनात पक्कं झालं होतं.....

'और कुछ देर ठहर' असं काळाला कितीही विनवून म्हटलं तरी तो थोडाच थांबतो? .....

राजेश आपल्यातून गेला ! प्रसारमाध्यमांनी राजेश खन्नाला श्रध्दांजली म्हणून त्याची खूप गाणी त्या काही दिवसात दाखविली. ती आवडीने व दुःखयुक्त अंतःकरणाने पाहिलीदेखील. पण ह्या गाण्याची वाट पाहूनही हे गाणं दिसलं नाही. कदाचित् black & whiteम्हणून मागे ठेवलं गेलं असावं.

पण शृंगारिक दृश्ये नसूनही ह्या गाण्यातला संयत रोमान्स पाहून कुणीही सुखावून जाईल....

हे गाणं रफीनं गायलं आहे... ते यू-ट्यूबवर ऐकाच.....

# कुठे आहेस तू....???

देवा ! परमेश्वरा !!.... कुठे रे आहेस तू? ... का रे बाबा, मला हे दुःख दिलंस? ..

हे आणि अशासारखे अनेक उद्गार माणूस बरेचदा काढत असतो. अगदी नास्तिक असलेले लोकही असा नामोच्चार अनवधानाने सह्ज करत असतात. जितका 'आई ग !' हा उद्गार मुखातून सहजतेने येतो तितक्याच सहजतेने देवाला संबोधित केलं जातं. जेव्हा माणूस हतबल होतो, काय करावं हे सुचत नाही, मार्ग सापडत नाही, तेव्हा तेव्हा तो अशी आळवणी करतो. याचा अर्थ देव येऊन काही प्रश्न सोडवणार नसतो. त्याचं नाव घेणाऱ्यालाही हे माहीत असतं. पण त्याच्या हताश भावनेला शब्द मिळतात, कोंडी फुटण्याला थोडी वाट मिळते. त्यामुळे थोडं हलकं वाटतं. देवाचा असा उपयोग होत असेल, कुठूनही परिस्थितीची तीव्रता जर कमी होत असेल तर अंधश्रध्देवर आक्षेप घेणारेही कदाचित् हा मुद्दा 'वैयक्तिक' म्हणून सोडून देतील असं वाटतं.

आत्ता आपल्या देशाची, भ्रष्ट व स्वार्थी आणि मूल्यहीन समाजाची स्थिती पाहूनही देवाचीच आठवण झाल्याशिवाय रहात नाही. असं वाटतं की ''हे चाललंय् तरी काय? कुठे भरकटत चाललाय् माणूस? धर्माच्या नावाखाली फोफावतोय् अधर्म आणि दहशतवाद ! कोणाला कशाचा विधिनिषेध नाही. देवाला दिसतंय् का हे सगळं? बहुधा तो आंधळा, बहिरा अपंग... असा आहे. मला त्याला खूप काही सांगायचंय्, तो दिसत नाही म्हणून निदान त्याला पत्र पाठवून कळवायचंय्... पण.....

वाचा हे गीत....

*भगवान तुझे मैं खत लिखता, पर तेरा पता मालूम नहीं*

*रो रो लिखता, जब भी लिखता, पर तेरा पता मालूम नहीं.....*

अडचण हीच आहे, देवा ! तुला खूप काही सांगायचं आहे... पत्र लिहून कळवायचं आहे, पण तुझा पत्ताच माहीत नाही... !! असं म्हणतात की तू सगळीकडे आहेस. म्हणूनच तुझा नेमका पत्ता कोणालाच माहीत नसावा.... तुझा पत्ताच नाही, मग तू नाहीसच की काय..? असा अर्थही यातून निघू शकतो...

हे गीत 1953 मध्ये प्रदर्शित झालेल्या ''मनचला'' य हिंदी चित्रपटातील आहे. खूप वर्षांपूर्वी ते ऐकलं होतं. पण नंतर कुठेच शोध घेता येत नव्हता. कारण हे गाणं माहीत आहे का म्हटल्यावर सगळ्यांकडून नकारार्थीच उत्तर यायचं.

पुढे कवी लिहितो,

*तुझे बुरा लगे या भला लगे, तेरी दुनिया अपनेको जमी नहीं*

*कुछ कहते हुए डर लगता है, यहां कुत्तोंकी कुछ कमी नहीं*

*मालिक, तुझे सबकुछ समझाता, पर तेरा पता मालूम नहीं.... 1*

*मेरे सरपे दुखों की गठरी है, रातों को नहीं मैं सोता हूं*

*कहीं जाग उठे न पडोसी, मैं इसलिए जोरसे नहीं रोता हूं*

*तेरे सामने बैठके मैं रोता, पर तेरा पता मालूम नहीं..... 2*

*कुछ कहूं तो दुनिया कहती है, 'आंसू न बहा बकवास न कर'*

*ऐसी दुनियामें रख के मुझे, मालिक, मेरा सत्यानास न कर*

*तेरे पास मैं खुद ही आ जाता, पर तेरा पता मालूम नहीं..... 3*

ह्या गाण्याचे गीतकार व गायक कोण ही माहिती उपलब्ध नाही. मात्र संगीत चित्रगुप्त यांचे आहे.

सरळ, सोप्या शब्दातलं हे गाणं मनाला अस्वस्थ करून जातं.

चित्रपटात हे गाणं एक भिकारी गात असतो. तो प्रथम मंदिराबाहेर उभा राहून भीक मागतो, पण कोणीच काही देत नाही. मग एका मशिदीबाहेर थांबतो, तिथेही पदरी निराशाच येते. म्हणून तो एक दारूच्या गुत्त्याबाहेर उभा राहून भीक मागतो. तिथे लोक त्याला दया दाखवितात. तेव्हा त्याच्या तोंडी एवढाच संवाद आहे, '' देवा, राहतोस कुठे आणि पत्ता मात्र भलताच ( मंदिर-मशिदीचा) देतोस !''

करुणा हे देवाचं रूप आहे. ज्यांनी त्याला भीक घातली ते लोक सहृदय होते. जरी ते गुत्त्यातून बाहेर पडले तरी त्यांच्या हृदयात ईश्वर वास करत होता. मंदिर-मशिदीतून जाणारे लोक देवदर्शन घेत होते पण त्यांच्या हृदयात माणसाबद्दल करुणा नव्हती. मग देव कोठे भेटणार? तो मंदिरात नाही, तर मदत देणाऱ्या हातामध्ये आहे ! म्हणूनच साईंचा संदेश आहे, HELP EVER, HURT NEVER !!

## कथा-एका कवितेची... गीतांजलीमधून

आज एका कवितेचा गोषवारा सांगावासा वाटतो आहे. कवीचं नाव? ..... ते नंतर सांगते.

कवितेत एक निर्धन, वयस्क व्यक्ती आहे.. काळ खूप जुना... पुरातन.. तो गरीब माणूस बिचारा रस्तोरस्ती फिरत आहे. कुणी काही देईल का? .. काही धान्य.. काही पैसे... काही जुने-पाने कपडे.....? मनात आशा आहे... खांद्यावर झोळी घेऊन आणखी, दिसेल त्याची विनवणी करायला हवीय्....

पण हे काय? रस्त्यावर एकदम एवढी गडबड.. ही धावपळ कशासाठी सुरू झालीय्? हे तर राजाचे शिपाई ! हुकमी आवाजात ते रस्त्यावर च्या सगळयांना पांगावताहेत... सगळयांना सांगताहेत, बाजूला व्हा.. रस्त्याच्या कडेला व्हा... कडेला जाऊन उभे रहा... राजेसाहेबांची स्वारी इकडून जाणार आहे... रस्ता मोकळा करा....

त्या गडबड-गोंधळात ह्या निर्धन.. फाटक्या व्यक्तीवर जो तो खेकसतो आहे.... ए।, चल हो बाजूला.... कुणीतरी त्याला ढकलून कडेला नेतं... लक्ष्मीच्या दराऱयापुढे लाचार निर्धनाचं काय चालणार..?

बिचारा अंग चोरून कडेला जाऊन उभा राहतो.. मनात येतं, निदान आज राजाला बघता तरी येईल... !वेडं मन म्हणतं, माझी ह्या राजाशी भेट झाली तर काय बहार येईल !मी त्याच्याकडून धन मागून घेईन.. माझं दारिद्र्य कायमचं नष्ट

होऊन जाईल.... गरीबांच्या मनोरथांना कधी अंत असतो का?

तेव्हढ्यात.... दबक्या आवाजातली गडबड ऐकू आली... आले ।.. आले.. ।तो पहा, रथ दिसतो आहे...

रथ दिसू लागला.. पांढऱ्या घोड्यांचा.. सोन्यानं मढवलेला.. आणि आत होता स्वत: राजा !! देखणा... तरणा... रुबाबदार... प्रजेचा स्वामी..

ह्या निर्धन माणसाच्या आशा पुन्हा पालवल्या... हा रथ जर माझ्याजवळ येऊन थांबला तर....? ..

अन् हे काय? खरोखरच राजाचा रथ येऊन थांबला.. त्याच्याच जवळ... आणि राजाने त्यालाच खूण केली. जवळ येण्याची.... मनात कितीही कल्पना केली असली तरी प्रत्यक्षात अनपेक्षितपणे तसं घडल्यावर त्या निर्धन व्यक्तीला काही सुचेना... तो जागचा हलूही शकला नाही. विस्फारल्या डोळयांनी तो राजाकडे पाहातच राहिला... शेवटी राजा स्वत: रथावरून पायउतार झाला. त्या गरीब माणसाजवळ आला..

आ । हा।... काय सौंदर्य ! केवढं लक्ष्मीचं तेज... गरीब माणसाचे डोळे दिपले... राजा त्याच्यापुढे येऊन म्हणाला, बाबा, अहो बाबा, होय मी तुमच्याशीच बोलतोय... इकडे तिकडे काय पाहताय्? .. तुमच्याशीच बोलतोय् मी ! मला सांगा, तुमच्या झोळीत काय आहे? मला द्या नं, काय असेल ते... जरा भूक लागलीय् !

काहीही चालेल...

अरे दैवा !! गरीब माणूस मनात म्हणाला, मी काय समजत होतो, की राजाकडून मला काही मिळेल.. हा तर उलटा न्याय झाला... हाच म़ाझ्याकडे काहीतरी मागतोय्.. !!

कल्पनांच्या भरारया संपून मन एकदम ताळयावर आलं. जराशा तुच्छतेनंच गरीब माणसानं आपल्या झोळीतले चिमूटभरच धान्याचे दाणे, राजाच्या पसरलेल्या हातावर ठेवले. राजा हसून निघून गेला..... रथ दूर दूर गेला.....

हा निर्धन माणूस निराश मनाने घरी निघाला... घर कसलं ! मोडकी-तोडकी झोपडी होती ती एक. नशिबाला दोष देत, हळहळत चालला होता बिचारा..... मनात म्हणत होता,

घरी पोहोचला.. बायकोनं विचारलं, काय भीक मिळाली? त्यानं झोळी तिच्यापुढे उपडी केली.... आणि हे काय? या झोळीतल्या धान्यात हे काय चमकतंय्? अरेच्या ! हे सोन्याचे कण? ग़ाणि ही मौल्यवान हिरे-माणकं? ... आनंदाश्चर्यानं त्या माणसानं ती धान्यातून वेचून बाजूला काढली... सगळी मिळून हातात घेतली. सगळं मिळून चिमूटभरच होतं ते धन !.. आत्ता त्या निर्धनाला अर्थ उलगडला... हिरे – माणकं पाहून झालेल्या आनंदाची जागा आता दु:खानं घेतली. पश्चात्तापाचे अश्रू त्याच्या डोळयातून वाहू लागले. अरेरे !! मी फक्त चिमूटभरच धान्य का दिलं राजाच्या हातावर? सगळी झोळीच का नाही त्याच्या ओंजळीत रिकामी केली? किती करंटा मी ! किती कंजूष ! किती लोभी मी !जर माझ्याजवळचं सगळं धान्य मी दिलं असतं तर आज मलाही भरभरून मिळालं असतं....

चिमूटभर दिल्यानं चिमूटभरच मिळालं !!

अशी ही कविता ! कोणाची आहे माहित आहे? भारतासाठी वाङ्मयाचं एकमेव नोबेल पारितोषिक ज्यांनी मिळवलं त्या पूज्य रवीन्द्रनाथ टागोर यांची.. गीतांजली हा त्यांचा अनमोल काव्यसंग्रह ! नोबेलविजेता. त्यातली ही कविता ! तिचा हा गोषवारा... किंवा स्वैर भावानुवाद म्हणा हवं तर..

मला ही कविता फार आवडते. किती मार्मिकपणे जीवनाचं मोठं तत्त्वज्ञान कवीनं सांगितलंय् !जेवढं तुम्ही इतरांना द्याल, तेवढंच तुम्हाला मिळेल.. ! म्हणून स्वत:ला काही मिळण्याची अपेक्षा करण्यापूर्वी आपल्याला जे शक्य असेल ते आधी दुसऱ्याला दिलं पाहिजे.. भले आपल्याजवळ थोडं का असेना, त्यातला काही हिस्सा आपण दान केलं पाहिजे.. ( हे फक्त पैशाबाबतच नाही... प्रेमही दिलं तरच मिळतं.. )

तुम्ही म्हणाल, आजच्या लाखो-कोटींच्या भ्रष्टाचाराच्या ह्या काळात ही कविता काय कामाची!!आपले नेते आज जे काही करत आहेत, ते तर याच्या विरुध्दच आहे ! हो, कारण ते संस्कार विसरले आहेत.. ह्या कवितेतून सांगितला आहे तो संस्कार ! आताच्या नेट संस्कारात हे बसत नाही. पण हे पुढे आलं पाहिजे.. सामान्य माणसाच्या मनात ते आहेच, ते जागं केलं पाहिजे...

टागोरांसारख्या कवीच्या शब्दांना काहीतरी तर अर्थ असलाच पाहिजे ! तुम्हाला काय वाटतं??

## एकदा काय झालं,

भरतभूमीचं भाग्य उजळलं... ! तिच्यात चांदण्याचं बीज रुजलं..... स्वरांची बरसात झाली....... बीज अंकुरलं... लयीत वाढू लागलं... तालावर डोलू लागलं.... आणि त्या अंकुराची अमृतवेल झाली.... ! अमृतवेल फोफावली... राग-रागिण्यांच्या पानांनी डवरली... गीतांच्या दिव्यसुगंधी फुलांनी मोहरली.... उंचउंच गेली.. अमृतवेल गगनावर चढली.. !.. अमृतवेल.. अमृताची लता ! लता मंगेशकर.. ! २८ सप्टेंबर १९२९ हा त्यांचा जन्मदिवस... त्यानिमित्त या वेलीच्या गीतफुलांचं स्मरण होणं अपरिहार्यच आहे.. त्यातील हे एक..

हाले-दिल यूं उन्हें सुनाया गया,
आँख ही को जुबाँ बनाया गया...

हे शब्द कवी राजेंद्रकृष्ण यांचे.... शब्द.. संत तुकाराम म्हणतात, &&आम्हां घरी आहे, शब्दांचेच धन.. & कवींना तर शब्दांचे राजे म्हणतात... तरीही शब्द केव्हा केव्हा खुंटतात... अडखळतात. तोकडे पडतात. माणसाच्या मनाला स्वत:मध्ये सामावण्याचा त्यांचा प्रयत्न निष्फळ ठरतो.. शब्द निप्रभ होतात... हा तर आणीबाणीचा प्रसंग !अशावेळी माणसानं भावना व्यक्त करायच्या तरी कशा? पण कवीला व प्रेमिकांना ह्या प्रश्नावरही मात करता येते... वरील दोन ओळीत म्हटल्याप्रमाणे डोळयांनाच बोलतं करता येतं.. डोळयांनीच ह्लदयाची प्रेमामुळे झालेली अवस्था प्रेमी सांगू शकतो.. इन्तज़ार करून शिणलेले डोळेच सांगतात की,

जिंदगीकी उदास रातों को
आपकी यादसे सजाया गया...

जीवनातल्या त्या काळयाकुट्ट, उदास अन् एकाकी रात्री ! पण त्याही रात्रींना आम्ही सजविण्याचा प्रयत्न केला, तुझ्या आठवणींनी... !

अशी आठवणींवर गुजराण करण्याची वेळ एखाद्यावर का यावी? पण ती येते. कारण पुन्हा शब्द. माणसं शब्द देतात; पण क्वचितच पाळतात. ही वस्तुस्थिती मानायला प्रेमी मन मात्र तयार नसतं. शब्दांवर विश्वास ठेवायचा आणि स्वत:ची फसवणूक करून घेत रहायचं, हीच एक आंधळी मालिका सुरू राहते.. पण अशा वाटचालीतून प्रेमाच्या ईप्सितापर्यंत थोडंच पोहोचता येतं?

इष्क़की वोभी एक म़ंजिल थी
हर क़दमपर फ़रेब खाया गया..

पावला-पावलांगणिक फसगत (फ़रेब) हा देखील प्रेमाच्या पूर्ततेचा (म़ंजिल) चा एक भागच असावा.

फसगतीच्या अशा ठेचा खात प्रीतीचा खडतर मार्ग अविचलपणे आक्रमत राहणं ही काही सोपी गोष्ट नाही. कारण स्वत:ची फसगत झाल्याची दुष्ट जाणीव माणसाला एकही सुखाचा श्वास घेऊ देत नाही. तो बेचैन होतो.. अस्वस्थ होतो.. मन तडफडतं... पण ही तडफड मात्र लपवावी लागते.

दिलपे इक वोभी हादसा गुजरा
आजतक उनसे जो छुपाया गया...

मनावर गुदरलेल्या संकटामुळे (प्रीतीच्या) ते उद्ध्वस्त झालं हे खरं, पण आम्ही मात्र आजवर ते मोठ्या शिकस्तीनं त्यांच्यापासून लपवून ठेवलं आहे..

बिचारं मन !! ते अशा संकटांना सर्व तयारीनिशी सामोरं जातं. झगडतं. सोशिक असूनही जखमी होऊन राहतं... तरीही आपले घाव लपवण्याचा प्रयत्न

करतं. अशा घायाळ मनानं जीवन जगण्याची जेव्हा वेळ येते तेव्हा त्या विधात्याला विचारावंसं वाटतं,

लाख तूफाँ समेटकर यारब
किसलिये एक दिल बनाया गया...?

हे ईश्वरा, लाखो वादळं, संकटं एकत्र केलीस नि हे माणसाचं मन घडवलंस; सांग ना, कशासाठी केलंस असं? का निर्माण केलंस तू हे मन? वादळं सामावून घेऊन उद्ध्वस्त होण्यासाठीच ना??

ह्या प्रश्नाचं उत्तर देण्यास परमेश्वराजवळ शब्द नसावेत; नाहीतर त्याचं उत्तर कवीनं पुढच्या शेरात नक्की सांगितलं असतं...

कवीच्या शब्दांचं सामर्थ्य असं काही असतं की ते शब्द आपोआप सुरांना उद्युक्त करतात.. शब्दांचा सुगंध जेव्हा सुरांच्या पाकळयांच्या कोषात विराजमान होतो, तेव्हा त्याचं एक सुंदर फूल बनतं.. आणि जेव्हा ते लताजींच्या कंठातून उमलतं तेव्हा रसिकांना भृंग होण्यावाचून गत्यंतर नसतं.. ! जहाँआरा ह्या चित्रपटाच्या माध्यमातून मदनमोहन, राजेंद्रकृष्ण आणि लता या तिघांनी मिळून ही पुष्पभेट रसिकांना सादर केली होती... लताजींनी आपल्या सर्वांचं जीवन समृध्द केलंय्......

लताजींना आपण कृतज्ञतेच्या फुलांचा गुच्छ देऊन दीर्घायुष्याच्या शुभेच्छा देऊ या...

## सुभाषिते...

देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे,

एक दिवस घेता घेता, घेणाऱ्याचे हात घ्यावे...

कविश्रेष्ठ विंदा करंदीकरांच्या ह्या ओळी आपल्या सर्वांच्या चांगल्या परिचयाच्या आहेत. आता ह्या ओळी पहा, ''अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा, किनारा तुला पामराला. ''ह्या ओळी कुसुमाग्रज यांनी सागराला उद्देशून म्हटल्या आहेत. हे दोघेही ज्ञानपीठ पुरस्कारविजेते कवी आहेत.

सुरेश भट यांच्या ह्या ओळी पाहा,

उषःकाल होता होता काळरात्र झाली, अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली...

अशा ओळी सहज सर्वांच्या ओठी घोळतात. एकवेळ कवीचं नाव माहीत नसेल, पण त्यांच्या ओळी मात्र नेहमीच्या वापरातले वाक्प्रचार वापरावेत, तशा वापरल्या जातात. त्यामुळे ते कवी अजरामर झालेले असतात. ह्यांनाच म्हणतात, सुभाषिते.

अशीच एक ओळ... ''आहे मनोहर तरी गमते उदास'' तुम्हाला आठवलं ना की सुनीताबाई देशपांडे यांच्या आत्मचरित्राचं ''आहे मनोहर तरी.. ''हेच शीर्षक आहे!

पण ज्या कवितेतील ही ओळ आहे, ती कविता वा तो कवी आपल्याला

फारसा माहीत नाही. ते कवी होते, दिनकर नानाजी शिंदे. त्यांनी सरस्वतीकंठाभरण ह्या टोपण-नावाने लेखन केलं आहे.

पूर्वी, कवितेची एखादी ओळ देऊन कवींना समस्यापूर्ती करण्यास सांगत असत. म्हणजे, दिलेली ओळ आणखी ओळी लिहून त. यात गुंफायची. आहे मनोहर तरी गमते उदास, या ओळीची समस्यापूर्ती करणारी आठ कडवी दिनकर नानाजी शिंदे यांनी लिहिली. ती सगळीच कविता फार सुंदर आहे. सगळं काही आहे, पण एक काहीतरी नाही अशी खंत, आणि त्यामुळे येणारे औदासीन्य प्रत्येक कडव्यात आलेलं आहे. त्यातील काही कडवी अशी आहेत... कविता वसंततिलका या वृत्तात लिहिलेली आहे.

सर्वांगसुंदर, सुभूषण वस्त्रयुक्त । चैतन्य, वाणि, मन, बुध्दिदहि ज्या प्रशस्त ।

ऐसे शरीर, परि शील नसे तयास । आहे मनोहर तरी गमते उदास ।।

खरंय् ना? एखाद्या व्यक्तीजवळ शरीरसौष्ठव आहे, ते सुंदर वस्त्रालंकारांनी नटलेलं आहे, व्यक्तिमत्त्व प्रसन्न आहे, ती व्यक्ती बोलण्यात चतुर आहे, मनानं निर्मळ आहे, बुध्दिमानही आहे, पण त्या व्यक्तीची वागणूक मूल्यांना धरून नाही, तर ते सर्व गुण वाया गेले असेच नाही का?

पुढील कडवे असे आहे..

आम्रादिकी गगनचुंबित थोर वृक्षी । उद्यान एक भरले लतिका-विशेषी।

तेथे परंतु न वसंत करी विलास । आहे मनोहर तरी गमते उदास ।।

एखाद्या उद्यानात आंब्याची डौलदार झाडं आहेत, विशेष प्रकारच्या सुंदर वेली आहेत, पण या सगळयावर मोहोरच नाही, फुलांचा वसंतच नाही, तर काय उपयोग? पुढे कवी लिहितो,

निद्रेत मी नृपति होउनि सौख्य भोगी ।

की चित्पदी मिळुनि जाइ बनोनि जोगी ।

जेव्हा कळे सकल हा परि स्वप्नभास ।

आहे मनोहर तरी गमते उदास ।।

---एखादेवेळी आपल्याला स्वप्न पडतं. स्वप्नात आपण राजा असतो, सगळी सुखं आपल्या पायाशी लोळण घेत असतात;किंवा एखादेवेळेस स्वप्नातच आपण कुणी योगी असतो; आपली साधना सफल होऊन आपण ईश्वरचरणी विलीन होऊन जातो, एकरूप होऊन जातो.... ही दोन्ही स्वप्ने आनंद देणारी आहेत.. पण ती स्वप्नेच आहेत. जाग आल्यावर जेव्हा कळतं की तो आनंद क्षणिकच होता, तेव्हा मन अगदीच उदास होऊन जातं...

पण उदास न होता आपण शाश्वत आनंदाचा शोध घ्यायचा असतो.

तसा आनंद शोधणं हेच तर मानवी जीवनाचं अंतिम उद्दिष्ट आहे !

## मीनाकुमारी---

रुपेरी पडद्यावरची 'ट्रजिडी क्वीन' मीनाकुमारी आठवतेय्? जुन्या परिणीता मधली? अशोककुमारवर मूक प्रेम करणारी ! सिनेमाभर दुःख सहन करणारी ! खूपशा सिनेमांमधून ती स्वतः रडायची आणि प्रेक्षकांना रडवायची. म्हणजेच उत्तम अभिनय करायची. दिसायचीही छान. तिचा शेवटचा सिनेमा होता 'पाकीजा'. मला आठवतंय्, पूर्वीच्या पुण्यात डेक्कन जिमखान्यावर 'हिंदविजय' नामक त्यावेळचं शानदार थिएटर होतं. तिथं पाकीजा लागला होता. आम्ही मीनाकुमारीचे 'फॅन', तो बघायला गेलो होतो. सिनेमा एकदम मधेच थांबला आणि पडद्यावर पाटी आली, 'मीनाकुमारी' यांचे आजच अमुक वाजता दुःखद निधन झाले' !

आम्हीही  दुःखात बुडालो व अश्रू गाळतच पुढचा सिनेमा बघितला होता...

ती मीनाकुमारी एक शायरां (उर्दू कवयित्री) सुध्दा होती. तिचं काव्यातलं नाव (तखल्लुस) होतं 'नाझ'. उर्दू शायरीसाठी वरदान ठरणारी दुःखाची देणगी तिला व्यक्तिगत जीवनातही भरपूर लाभली होती, असं म्हणतात. तिच्या शायरीतही दुःखाची झलक पाहायला मिळते.

हे दोन शेर वाचा----

आगाज तो होता है, अंजाम नहीं होता

जब मेरी कहानीमें, वो नाम नहीं होता.....

हंस हंस के जवॉं दिलके हम क्यों न चुने टुकडे

हर शख्स की किस्मत में ईनाम नहीं होता....

ती म्हणते, माझी प्रेमाची कहाणी सांगायला (अथवा लिहायला) मी सुरुवात (आगाज) तर करते; पण ते नाव वगळून माझी कहाणी पुढे जाऊच शकत नाही; व तिचा शेवटही (अंजाम) होऊ शकत नाही.

पण तरीही ते नाव ती कवितेत गुंफत नाही. ते नाव तिला अव्यक्तच ठेवावंसं वाटतं. कारण, प्रेमातील वफादारीला( विश्वास) बाधा येऊ नये. एकवेळ कहाणी 'अधूरी' राहिली तरी चालेल !

दुस-या शेरात तिनं म्हटलंय्,

-----हृदयाचे झालेले तुकडेही हसत हसत गोळा करायला काय हरकत आहे? प्रत्येकाच्याच नशिबात, प्रेमासाठी प्रतिप्रेमाचं बक्षीस (ईनाम) मिळणं लिहिलेलं नसतं !....

हाही ख-या प्रीतीचा आणकी एक गुण ! जे मिळेल ते स्वीकारायचं. ज्या व्यक्तीवर आपण प्रेम केलं तिच्याकडून आपल्याला प्रेम मिळालंच पाहिजे, असा हट्ट का असावा? ते दान मिळणार नाही हेही स्वीकारायचं. असं निरपेक्ष प्रेम करता आलं पाहिजे...

प्रेमाची अपेक्षा करता येईल असं एकच ठिकाण आहे; तिथं आपलं प्रेम रुजू होईल व त्याला प्रेमाच्या रूपाने उत्तरही मिळेल; ते ठिकाण म्हणजे... ईश्वर !!

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी सिनेमा हा एकेकाळी भारतात हिंदी सिनेमाच्या तोडीस तोड किंवा काकणभर वरचढच होता. मध्यंतरी मराठी सिनेमाला उतरती कळा लागली. प्रेक्षक येईना. म्हणून थिएटर मिळेना. थिएटरच मिळत नाही म्हणून चांगले मराठी सिनेमा बनेनात. आणि चांगले सिनेमा नाहीत म्हणून प्रेक्षक मिळेनात. असे एक दुष्टचक्र सुरू झाले. मग आला झी मराठी सिनेमा. आणि त्याच्याच जोडीने छोट्या आकाराची मल्टीप्लेक्स आणि डिजिटल प्रक्षेपण. त्यामुळे पुन्हा एकदा मराठी सिनेमा जोमाने बहरू लागला.

काहीशी अशीच परिस्थिती मराठी साहित्याचीही होत आहे. एकेकाळी टॉपला असलेले मराठी साहित्य मधल्या काळात टिव्ही आणि सिनेमाच्या युगात मागे पडले. पण आता मोबाईल आणि इंटरनेट यांच्यामुळे मराठी वाचकवर्ग फ़ार मोठ्या प्रमाणावर वाढतो आहे. आणि त्याच जोमाने त्यंच्यासाठी लिहिणारा दर्जेदार लेखक वर्गही निर्माण होऊ लागला आहे. मराठी साहित्याच्या भविष्याबद्दल आम्ही अत्यंत आशावादी आहोत.

आपली साथ मात्र पाहिजे. आपल्या ओळखीच्या जास्तीत जास्त लोकांना ई साहित्य बद्दल सांगा. त्यांचे ई मेल पत्ते व whatsapp नंबर कळवा. त्यांना ई साहित्यचं मोबाईल app download करायला सुचवा. आग्रह करा. ई साहित्यचे

मार्केटिंग करा. एकदम फ्रंट फुटवर येऊन खेळू. जबरदस्त मार्केटिंग करू. लाखांचे कोटी करू आणि मराठी साहित्य पुन्हा नंबर वन ला आणू.

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahitya.com

esahity@gmail.com

आता ई साहित्य चे APP उपलब्ध आहे. ई साहित्यचं App आपण खालील लिंकवरून आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करा आणि भरमसाट पुस्तकं फ्री वाचा.

https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

ई साहित्य प्रतिष्ठानची ई बुक्स Whatsapp broadcast service सुरू झाली आहे. पूर्णपणे फुक्कट पुस्तकं आता आपल्या मोबाईलवर थेट . कृपया नांव नोंदणीसाठी 7710980841 हा नंबर आपल्या मोबाईलवर सेव्ह करा आणि नंतर या नंबरवर वॉट्सऍप करून आपले नांव व शहराचे नांव कळवा. आपल्याला नियमितपणे एक नवीन मराठी ई पुस्तक Whats app द्वारे पाठवले जाईल. आपण ते पुस्तक आपल्या मित्रांना Whatsapp करा आणि भाव खा.

आपल्या ओळखीच्या किमान दहा लोकांचे मेल आय डी आम्हाला कळवा. त्यांना आम्ही विनामूल्य पुस्तके पाठवू. व आपल्याला VIP सभासद बनवले जाईल.